दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

उद्योजकांसाठी ७० कोटींचे कर्जवाटप; चिकलठाणा एमआयडीसीत विशेष उपक्रम

जिल्ह्यातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना आर्थिक बळ देण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने विशेष कर्जवाटप उपक्रम आयोजित करण्यात आला. चिकलठाणा एमआयडीसी येथील MASSIA परिसरात झालेल्या क्रेडिट आऊटरीच शिबिरात उद्योजकांना तब्बल ७० कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले. या उपक्रमादरम्यान आणखी ३५ कोटी रुपयांच्या कर्ज प्रस्तावांनाही प्रतिसाद मिळाल्याची माहिती समोर आली आहे.

आजचा सुविचार

“सत्य स्वतःसाठी, प्रेम इतरांसाठी आणि दया सर्वांसाठी—हाच समाधानी आयुष्याचा खरा मंत्र आहे.”

छत्रपती संभाजीनगर ❀ रावीवार दि. 22 नोव्हेंबर - 2026 ❀ वर्ष ;1 ❀ अंक ; 187 ❀ पाने .4 ❀ किमंत 4 रू ❀ email:hinduprakashvarta@gmail.com / Postal Regn ,No, ABD/551/2026/2028

अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

नागरिकांना सुरक्षित आणि स्वच्छ अन्नपदार्थ मिळावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनाने जिल्ह्यात तपासणी मोहीम तीव्र केली आहे. ‘सेफ फूड, सेफ महाराष्ट्र’ मोहिमेअंतर्गत तीन हॉटेल आणि एका मिठाई उत्पादकाच्या अन्न व्यवसाय परवान्याचे निलंबन करण्यात आले आहे. १८ नोव्हेंबर रोजी करण्यात आलेल्या तपासणीदरम्यान काही ठिकाणी अस्वच्छता, अन्नपदार्थ उघड्यावर ठेवणे तसेच अन्नसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळले. कन्नड तालुक्यातील वासडी येथील मिठाई विक्री केंद्रांमध्येही तपासणी करण्यात आली. या तपासणीनंतर संबंधित आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. अन्नपदार्थ तयार करताना स्वच्छता राखणे, खाद्यपदार्थ योग्य पद्धतीने साठवणे आणि ग्राहकांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या व्यावसायिकांवर प्रशासनाकडून कठोर कारवाई केली जाणार आहे. नागरिकांनीही अन्नपदार्थ खरेदी करताना स्वच्छता आणि गुणवत्तेकडे लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे



प्रकरणातील निदा खानच्या संसारात वादळ

नाशिक :प्रतिनिधी

टीसीएस कंपनीतील कथित धर्मांतर आणि अत्याचार प्रकरणामुळे चर्चेत आलेल्या निदा एजाज खान (वय २६) हिच्या वैयक्तिक आयुष्यातही मोठे वादळ निर्माण झाले आहे. या प्रकरणातील गंभीर आरोप आणि त्यातून निर्माण झालेल्या सामाजिक बदनामीच्या पार्श्वभूमीवर निदाच्या पतीने घटस्फोटासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मात्र, पतीने घटस्फोटाची भूमिका घेतली असली, तरी निदा खानने संसार टिकवण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवल्याचे समोर आले आहे.निदाच्या पतीने नाशिकरोड येथील कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे. या प्रकरणी झालेल्या दुसऱ्या समुपदेशनावेळी निदा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित राहिली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पती घटस्फोटाच्या निर्णयावर ठाम असल्याचे सांगितले जात असताना निदाकडून मात्र वैवाहिक नाते टिकवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या दाम्पत्याचे पुढील समुपदेशन १९ जानेवारी रोजी होणार आहे. या प्रकरणात निदाच्या वतीने ॲड. शोभा प्रकाश ताजनपुरे आणि ॲड. प्रकाश ताजनपुरे बाजू मांडत आहेत, तर तिच्या पतीच्या वतीने ॲड. नितीन पंडित



काम पाहत आहेत.नेमकं TCS प्रकरण काय ?टीसीएस कंपनीतील कथित धर्मांतर आणि अत्याचाराच्या प्रकरणांमुळे नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली होती. मुंबई नाका पोलीस ठाण्यात कंपनीतील एका तरुणाच्या तक्रारीवरून तौसिफ अत्तार, दानिश शेख, शाहरुख कुरेशी, रझा मेमन यांच्यासह निदा खानविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात कंपनीतील एका तरुणीने दिलेल्या तक्रारीवरून आणखी एक गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात दानिश शेख, तौसिफ अत्तार आणि निदा खान यांच्यासह अन्य संशयितांची नावे आहेत. तपासादरम्यान छत्रपती संभाजीनगरमधील एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल, घरमालक हानिफ शेख तसेच निदाच्या कुटुंबातील सदस्यांसह इतरांचीही नावे समोर आली आहेत.दोन्ही प्रकरणांत निदाला सशर्त जामीनया प्रकरणांच्या तपासादरम्यान निदा खानला न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागले. मुंबई नाका आणि देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यांतील दोन्ही प्रकरणांमध्ये नाशिकरोड आणि नाशिक जिल्हा न्यायालयाकडून तिला सशर्त जामीन मंजूर करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणांतील इतर संशयितांविरोधातही तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे.

१९ जानेवारीच्या समुपदेशनाकडे लक्षएकीकडे गंभीर गुन्ह्यांच्या तपासाचे आणि न्यायालयीन लढाईचे सावट, तर दुसरीकडे वैवाहिक आयुष्यात निर्माण झालेला तणाव, अशा दुहेरी परिस्थितीला निदा खान सामोरी जात आहे. पतीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला असला, तरी निदाकडून संसार वाचवण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती आहे. आता १९ जानेवारी रोजी होणाऱ्या पुढील समुपदेशनात काय घडते, पती-पत्नीमधील मतभेद मिटतात की घटस्फोटाच्या दिशेने पुढील प्रक्रिया सुरू होते, याकडे लक्ष लागले आहे.

सहा तासांच्या अथक प्रयत्नांनंतर १३ रानडुकरांना जीवदान; वनविभाग आणि बचाव पथकाची कामगिरी

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

सिल्लोड तालुक्यातील वांगी परिसरात पाण्याने भरलेल्या खोल विहिरीत पडलेल्या १३ रानडुकरांची वनविभाग आणि मॅनवथइंडीज फाउंडेशनच्या बचाव पथकाने सुखरूप सुटका केली. पहाटे तीन वाजता सुरू झालेले बचावकार्य सकाळी नऊ वाजेपर्यंत सुरू होते. तब्बल सहा तासांच्या प्रयत्नांनंतर सर्व वन्यप्राण्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. शेतकऱ्याच्या निदर्शनास विहिरीत रानडुकरे पडल्याचे आल्यानंतर त्यांनी तातडीने गावकऱ्यांच्या मदतीने वनविभागाला माहिती दिली. विहिरीत मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने रानडुकरांना बाहेर पडणे अशक्य झाले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वनपरिक्षेत्र अधिकारी एस. बी. तांबे यांनी बचाव पथकाशी संपर्क साधला. बचाव पथकाने आवश्यक साहित्य आणि सुरक्षित उपकरणांच्या मदतीने एकेक रानडुकराला बाहेर काढले. या मोहिमेत मनोज गायकवाड, आशिष जोशी, हर्ष केवारे तसेच वनविभागाचे कर्मचारी सहभागी झाले होते. सर्व प्राण्यांची तपासणी केल्यानंतर त्यांना पुन्हा नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. या घटनेमुळे ग्रामीण भागातील उघड्या विहिरींचा वन्यजीवांना असलेला धोका पुन्हा समोर आला आहे. शेतकऱ्यांनी विहिरींना संरक्षक कठडे किंवा जाळ्या बसवाव्यात, असे आवाहन वन्यजीव बचाव कार्यकर्त्यांकडून करण्यात आले आहे.

क्राईम ब्रँच, आर्थिक गुन्हे शाखेला आता पोलीस ठाण्याचा दर्जा; राज्य सरकारचा निर्णय

मुंबई : प्रतिनिधी

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेला (क्राईम ब्रँच) आणि आर्थिक गुन्हे शाखेला (ईओडब्ल्यू) आता अधिकृतपणे पोलीस ठाण्याचा दर्जा देण्यात आला आहे. राज्य सरकारने यासंदर्भातील अधिसूचना जारी केली असून, या निर्णयामुळे दोन्ही विभागांना आता गंभीर आणि आर्थिक गुन्ह्यांप्रकरणी प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करता येणार आहे. यापूर्वी संबंधित गुन्ह्यांची तक्रार स्थानिक पोलीस ठाण्यात नोंदवून त्यानंतर तपासासाठी ती क्राईम ब्रँच किंवा ईओडब्ल्यूकडे वर्ग केली जात होती.

गृह विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, गुन्हे शाखा आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या सह-पोलीस आयुक्तांच्या कार्यालयांना पोलीस ठाणे म्हणून घोषित करण्यात आले आहे. या दोन्ही पोलीस ठाण्यांचे स्थानिक क्षेत्र संपूर्ण मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीइतके असेल. त्यामुळे मुंबईत कुठेही घडलेल्या गुन्ह्याची एफआयआर या दोन्ही विभागांना दाखल करता येईल. ही पोलीस ठाणी मुंबई पोलीस आयुक्तांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

संवेदनशील आणि गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचा तपास गुन्हे शाखेकडे सोपवला जातो. तर, नऊ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून केला जातो. यापूर्वी अशा प्रकरणांमध्ये तक्रारदाराला संबंधित



परिसरातील स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी लागत असे. त्यानंतर तपासासाठी प्रकरण गुन्हे शाखा किंवा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केले जात होते. नव्या अधिसूचनेमुळे ही प्रक्रिया टाळता येणार आहे.

दरम्यान, हा निर्णय प्रशासकीय स्वरूपाचा असल्याचे गृह विभागातील सूत्रांनी स्पष्ट केले. यापूर्वी या दोन्ही विभागांना गुन्ह्यांचा तपास करणे आणि आरोपपत्र दाखल करण्याचे अधिकार होते. मात्र, स्वतंत्र पोलीस ठाण्याचा दर्जा नसल्याने त्यांना एफआयआर दाखल करता येत नव्हता. आता पोलीस ठाण्यांप्रमाणे गुन्ह्यांची नोंद, एफआयआर आणि स्टेशन डायरी ठेवण्याची प्रक्रिया या विभागांना राबवता येणार आहे.

अमली पदार्थांविरोधी मोहिमांसाठी मुंबई पोलिसांना ‘अँटी-नार्कोटिक्स व्हॅन’

मुंबई : प्रतिनिधी



अमली पदार्थांची तस्करी आणि विक्री रोखण्यासह गुन्ह्यांच्या तपासातील त्रुटी दूर करण्यासाठी मुंबई पोलिसांच्या ताफ्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त सुविधांची भर पडली आहे. देशातील पहिली ‘अँटी-नार्कोटिक्स व्हॅन’, अत्याधुनिक ‘फ्युजन सेंटर’ आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित ‘तपास सारथी’ प्रणाली अशा नव्या सुविधांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शनिवारी लोकार्पण करण्यात आले. अमली पदार्थांविरोधातील कारवाईपासून ते गुन्ह्यांच्या तपासातील पुरावे सुरक्षित ठेवण्यापर्यंतच्या प्रक्रियेत या तंत्रज्ञानाचा उपयोग होणार आहे. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, “आजकाल 30 ते 35 हजार लोकांच्या उपस्थितीत मोठे कार्यक्रम होतात. अशा ठिकाणी अनुचित प्रकार रोखण्यासाठी आणि तरुणांमध्ये जरब बसवण्यासाठी ही अँटी-नार्कोटिक्स व्हॅन अत्यंत उपयुक्त ठरेल. ड्रग्स डीलर किंवा संबंधितांवर कारवाई करताना पंचनामा, कॅमेरा रेकॉर्डिंग आणि पुराव्यांचे संकलन या व्हॅनच्या माध्यमातून योग्य पद्धतीने होईल. विशेष म्हणजे, गोळा केलेले पुरावे ब्लॉकचेन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षित साठवले जातील. ‘नशामुक्त भारत’ आणि ‘नशामुक्त महाराष्ट्र’ या मोहिमांसाठी राज्याच्या इतर भागांतही अशा व्हॅन्स तयार केल्या जातील", असेही त्यांनी सांगितले.

गुन्ह्यांच्या तपासात तांत्रिक त्रुटींमुळे आरोपी निर्दोष सुटू नयेत, यासाठी सरकार ‘तपास सारथी’ ही प्रणाली विकसित करत आहे. एफआयआरपासून ते आरोपपत्र आणि पुरावे व्यवस्थापनापर्यंतची संपूर्ण साखळी एआयच्या मदतीने एकाच दुव्यात आणली जात आहे. आता 60 ते 90 दिवसांत आरोपपत्र दाखल करण्याच्या प्रक्रियेचे देशभरात निरीक्षण केले जाते आणि त्यावर राज्याचे क्रमवारीत स्थान ठरते. हजारो पानांचे आरोपपत्र तयार करताना पुराव्यांची साखळी कशी असावी, यासाठी न्यायालयाचे जुने निर्णयही या प्रणालीत समाविष्ट केले जात आहेत. नवीन कायद्यांनुसार डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक पुरावे ग्राह्य धरले जात असल्याने ‘हॅश व्हॅल्यू’च्या आधारे संपूर्ण प्रक्रिया सुरुवातीपासून शेवटपर्यंत डिजिटल करण्यावर भर दिला जात आहे. मुंबई पोलिसांनी देशात नेहमीच आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, जागतिक स्तरावरही त्यांची कीर्ती आहे. आता सीसीटीव्ही, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, डेटा विश्लेषण, सोशल मीडिया आणि डार्क नेटचे विश्लेषण करून घडणारे तसेच घडू शकणारे गुन्हे रोखण्यासाठी मुंबई पोलीस अधिक सज्ज झाले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.टी-नार्कोटिक्स व्हॅनची वैशिष्ट्येअमली पदार्थविरोधी कारवाईदरम्यान घटनास्थळावरील पंचनामा, चित्रिकरण आणि पुराव्यांचे संकलन एकाच ठिकाणी करता यावे, या उद्देशाने अँटी-नार्कोटिक्स व्हॅन तयार करण्यात आली आहे.या प्रक्रियेत संकलित झालेल्या पुराव्यांची सुरक्षितता आणि विश्वासार्हता राखण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. दुसरीकडे, ‘तपास सारथी’ प्रणालीमुळे गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपपत्र दाखल करण्यापर्यंतच्या प्रक्रियेवर तंत्रज्ञानाच्या मदतीने लक्ष ठेवता येणार आहे.सायबर गुन्हे, सोशल मीडिया आणि डार्क नेटच्या माध्यमातून होणाऱ्या गुन्हेगारी कारवायांचे स्वरूप बदलत असताना पोलिसांच्या तपासात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर या सुविधांमधून भर देण्यात आला आहे



संपादकिय

जनसंवाद

गुरुविण कोण दाखवील वाट ?

'गुरूपौर्णिमा' हा भारतातील एक महत्त्वाचा सण आहे. आषाढ महिन्यातील शुद्ध पौर्णिमेला गुरूपौर्णिमा साजरी केली जाते. भारतीय संस्कृतीत गुरूला देवाप्रमाणे मानले जाते. म्हणूनच गुरूपौर्णिमेला गुरूपूजनदेखील केले जाते. गुरूपौर्णिमेला व्यासपौर्णिमा असंही म्हणतात. कारण महर्षी व्यासांनी वेदांचे ज्ञान जगासमोर उघड केले. व्यासांनी महाभारत हा अलौकिक ग्रंथ लिहीला. तिथीनुसार हा दिवस महर्षी व्यासांचा जन्मदिवस असल्यामुळे या दिवसाला एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणूनच गुरूपौर्णिमेला व्यासपूजन देखील केले जाते. सर्वांच्या आयुष्यातील प्रथम गुरू म्हणजे 'आई'. कारण सर्वात पहिली संगत आपल्याला आईची लाभते. आई आपल्याला चालायला, बोलायला आणि जगायला शिकवते. जगातील प्राथमिक ज्ञान आपण आपल्या प्रथम गुरू म्हणजेच आईकडून घेतो. एवढंच नाहीतर आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आई आपली मार्गदर्शक असते. आईप्रमाणेच वडील आणि पुढे अनेक शिक्षक, मित्र, चांगली पुस्तके आपली गुरू असू शकतात. गुरू अथवा शिक्षक हा देवाप्रमाणे असतो या शिकवणीमुळेच भारतात गुरूपौर्णिमा मनापासून आणि श्रद्धापूर्वक साजरी केली जाते.- राजू जाधव, मांगूर, जि. बेळगांव

गुरुंबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस!

ज्ञान, संस्कार आणि आपले सुसंस्कृत जीवन घडवणाऱ्या गुरुंबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा! आषाढ महिन्यातील पौर्णिमेचा हा दिवस भारतीय संस्कृतीतील अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा सण मानला जातो. या दिवशी महाभारतासारखे महाकाव्य रचणाऱ्या आणि आद्यगुरु मानल्या गेलेल्या महर्षी वेदव्यास यांचा जन्म झाला होता. त्यामुळे या दिवसाला 'व्यास पौर्णिमा' असेही म्हटले जाते. खरे तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात माहितीचा महापूर आलेला असताना समाजातून सांस्कृतिक, अध्यात्मिक आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. या वेगवान जगात गुरु म्हणजे आपले शाळा, महाविद्यालयातील शिक्षक एवढीच मर्यादित परिभाषा राहिली नसून आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक (मेंटॉर्स) म्हणजे जीवन अधिक सुकर करणारे गुरु, असे गुरु या संज्ञेला व्यापक स्वरूप मिळाले आहे. अशा आयुष्याच्या अनेक टप्प्यावर जीवनाचे तारू सुखरूपपणे पैलतीरावर नेणाऱ्या गुरुंबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याच्या गुरुपौर्णिमेच्या या पवित्र दिवशी सर्वांना शुभेच्छा! - प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी (पूर्व)गुरुपौर्णिमा : गुरुंच्या ऋणाची कृतज्ञ आठवण९ जुलै रोजी साजरी होणारी गुरुपौर्णिमा ही भारतीय संस्कृतीतील ज्ञान, संस्कार आणि कृतज्ञतेचा उत्सव आहे. महर्षी वेदव्यास यांच्या स्मरणार्थ हा दिवस 'व्यास पौर्णिमा' म्हणूनही साजरा केला जातो. गुरु केवळ शिक्षण देत नाहीत, तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवतात, विवेक जागवतात आणि जीवनाला योग्य दिशा देतात. आज माहिती सहज उपलब्ध असली, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इंटरनेटचा वापर वाढला असला, तरी माहितीचे ज्ञानात रूपांतर करणारा आणि मूल्यांची जाणीव करून देणारा गुरुच असतो. राष्ट्रीय शिक्षण धोरणानेही शिक्षकांच्या मार्गदर्शक भूमिकेला अधिक महत्त्व दिले आहे. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आपल्या जीवनात प्रकाश पाडणाऱ्या सर्व गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करूया. त्यांच्या ऋणाची परतफेड शक्य नसली, तरी त्यांचे संस्कार आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.- प्रा. विजय कोष्टी, कवठे महांकाळ, जि. सांगलीगुरुपौर्णिमा : ज्ञानाचा आणि कृतज्ञतेचा पवित्र सोहळा

आषाढ पौर्णिमेला साजरी होणारी गुरुपौर्णिमा हा भारतीय संस्कृतीतील भक्ती आणि कृतज्ञतेचा पवित्र सण आहे. 'गु' म्हणजेच अंधार आणि 'रु' म्हणजेच प्रकाश; जो आपल्यातील अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देतो, तो गुरू होय. महर्षी वेद व्यास यांच्या जयंतीनिमित्त साजरी होणारी ही पौर्णिमा आपल्याला प्राचीन संस्कृतीशी जोडते. पहिली अक्षरं गिरवायला शिकवणारे शिक्षक, योग्य दिशा दाखवणारे आई-वडील आणि जीवनाचे मर्म सांगणारे आध्यात्मिक गुरु हे सर्वजण वंदनीय आहेत. गुरूंच्या आशीर्वादाने आयुष्यातील संकटांवर मात संकल्प करूया.-

मराठवाड्यात पिकांना नवसंजीवनी

मराठवाड्यात समाधानकारक सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जायकवाडी धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढल्याने पिण्याच्या पाण्याबरोबरच सिंचनाचीही चिंता कमी झाली आहे. पावसामुळे पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.



मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर तसेच जालना जिल्ह्यातील तीनशे गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. जायकवाडी धरण ६७.९९ टक्के भरले असून पावसाचा जोर आणखी कायम राहिल्यास भविष्यात पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. नाशिक जिल्ह्यासह गोदावरी नदीच्या वरील भागातील पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाला. त्यामुळे हजारो गावांसाठी लाभदायक असलेल्या जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. मागील महिन्याभरात झालेल्या पावसामुळे जायकवाडी धरणात २५ टीएमसी पाण्याची भर पडली आहे. मान्सूनच्या सुरुवातीला जायकवाडी धरणातील पाणीसाठा संपल्यात जमा होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात चिंता व्यक्त केली जात होती; परंतु जुलै महिन्यात नाशिकसह गोदावरीच्या वरील पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे जायकवाडी धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात हलका व मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू असल्यामुळे पिकांना देखील नवसंजीवनी मिळाली आहे. मध्यंतरीच्या काळात मराठवाड्यातील काही जिल्ह्यात पाऊस गायब झाल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

पाऊस नसल्यामुळे शेतकरी चिंतेत होते. गेल्या आठ दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड, धाराशिव, लातूर या जिल्ह्यात समाधानकारक पाऊस सुरू आहे. अलीकडच्या पावसामुळे मराठवाड्यातील पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवात जीव आला आहे. मराठवाड्यात येत्या दोन दिवसांत जोरदार पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात २४ तासांत ८९ मंडळात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३७, जालना जिल्ह्यातील २४ आणि बीड जिल्ह्यातील २८ मंडळांचा यामध्ये समावेश आहे. या तीन जिल्ह्यांत पावसाचा जोर कमी असल्याने आगामी काळातील पर्जन्यमानावर धरणांमध्ये जमणारा जलसाठा आणि पाणीसाठ्याचे भवितव्य अवलंबून आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भावसिंगपुरा, बालानगर, लोहगाव, पाचोड, विहामांडवा, गाजगाव, आसेगाव, सिद्धनाथ, वडगाव, करंजखेड, नाचनवेल, जरंडी, बनोटी या ठिकाणी दहा मिलिमीटर पेक्षा अधिकचा पाऊस झाला, तर बीड जिल्ह्यातील पिंपळनेर, गेवराई, धोंडराई, गंगामसला, नांदुर घाट, हनुमंत पिंपरी, केज, नागापूर या ठिकाणी देखील जवळपास १५ मिलिमीटरपेक्षा अधिकचा पाऊस झाला. त्यापैकी नांदूरघाट येथे सर्वाधिक ३० मिलिमीटर पाऊस झाल्याची नोंद आहे. जालना जिल्ह्यात भोकरदन तालुक्यात ४.२ तसेच जाफराबाद ३.९, जालना २.२, अंबड ४.८, परतुर २.८, बदनापूर १.६, घनसांगवी ३.८ आणि मंठा ०.९ मिलिमीटर पाऊस गेल्या २४ तासांत झाला. जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाल्याने छत्रपती संभाजीनगर तसेच जालना जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची गरज भागली जाणार आहे. याबरोबरच या धरणातून जवळपास ३०० गावांना पाणीपुरवठा होतो. तसेच औद्योगिक वापरासाठी वर्षभर पुरेल एवढा पाणीसाठा सध्या जायकवाडी धरणात उपलब्ध झाला आहे.

नांदेड, परभणी, हिंगोली या तीन जिल्ह्यांत गेल्या दोन दिवसांपासून मोठा पाऊस सुरू आहे. त्यामुळे शेतकरी देखील समाधानी आहेत. पिकांना जीवदान मिळाल्यामुळे दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर येणार नाही हे मात्र निश्चित आहे. लातूर तसेच धाराशिव जिल्ह्यातही चांगला पाऊस सुरू आहे. एकंदरीत मराठवाड्यातील पिकांची परिस्थिती समाधानकारक मानली जात आहे. शेतकरी समाधानी असून खरीप हंगामासाठी सिंचनाची उपलब्धता आणि पिण्याच्या पाण्याची भविष्यातील गरज लक्षात घेता पाण्याची आवक वाढल्यास संपूर्ण मराठवाड्याची चिंता मात्र नक्कीच मिटणार आहे.

संपूर्ण मराठवाड्यात येत्या दोन दिवसांत मुसळधार पाऊस पडणार आहे. नांदेड व लातूर जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे, तर हिंगोली, परभणी, जालना, बीड, धाराशिव या जिल्ह्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. शुक्रवार आणि शनिवारपर्यंत नांदेड, लातूर, बीड जिल्ह्यांत विजांसह वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मान्सूनच्या सुरुवातीला मराठवाड्यातील पिकांबद्दल चिंता व्यक्त केली जात होती. शेतकऱ्यांचे संपूर्ण आयुष्यमान शेती आणि पिकांवर अवलंबून असते. निसर्गाने कृपा केली तर शेतकरी ताठ मानेने जगू शकतो; परंतु निसर्गाची अवकृपा झाली तर शेतकऱ्यांच्या हातातील पिके निघून जातात. त्यामुळे संपूर्ण बाजारपेठेवर त्याचा परिणाम होतो. अलीकडच्या वातावरणामुळे तसेच पावसामुळे मराठवाड्यातील पिके तरारली आहेत. सध्याच्या परिस्थितीला तरी पिकांसाठी आवश्यक असलेला पाऊस पडलेला असल्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी समाधानी आहे. पावसामुळे पिकांना जीवदान तर मिळाले पण आणखी मोठा पाऊस झाला तर मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे मिटणार आहे. तसेच जनावरांसाठी लागणाऱ्या पाण्याचा प्रश्नही्यासुटू शकतो.

विशेष सखोल पुनरिक्षण १०० टक्के पूर्ण करण्यात चिपळूण राज्यात प्रथम

रत्नागिरी : प्रतिनिधी

मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचे काम १०० टक्के पूर्ण करणारा रत्नागिरी जिल्ह्यातील '२६५ – चिपळूण' हा राज्यातील पहिला मतदारसंघ बनला आहे. चिपळूणचे उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी आकाश लिगाडे यांनी याबद्दलची माहिती दिली.

अहोरात्र काम करणारे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बीएलओ यांचा या यशात सिंहाचा वाटा असल्याची प्रतिक्रिया लिगाडे यांनी व्यक्त केली आहे. याआधी १०० टक्के पुनरिक्षण



पूर्ण करणारे राज्यातील पहिले गाव बनण्याचा मान चिपळूण तालुक्यातल्याच मौजे टेरव बुद्रुक या गावाने पटकावला होता

.चिपळूण विधानसभा मतदारसंघात चिपळूण आणि संगमेश्वर तालुक्यातील ३३६ मतदान केंद्रांचा समावेश असून, मतदारसंख्या दोन लाख ७१ हजार ४३३ आहे. त्यात एक लाख ३८ हजार ६७५ स्त्रिया, तर एक लाख ३२ हजार ७५८ पुरुषांचा समावेश आहे. विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेत ९०.४० टक्के गणना प्रपत्रांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे.

९.५६ टक्के गणना प्रपत्रे जमा करण्यासारखी नव्हती (अनकलेक्टेबल). तसेच, मॅपिंग होऊ न शकल्याचे प्रमाण २.७९ टक्के एवढे आहे. आता आठ ऑगस्टपर्यंतच्या उर्वरित कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या पातळीवर फेरपडताळणी आणि मॅपिंगचा प्रयत्न केला

wजाणार आहे.डिजिटायझेशन झालेल्या गणना प्रपत्रांची तपासणी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पातळीवर केली जाणार आहे. सहायक आणि अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांपासून त्यांना साह्य करणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांतून हे काम १०० टक्के पूर्ण करता आले, असे आकाश लिगाडे यांनी सांगितले.



लाचखोरी प्रकरणात मंत्री नरहरी झिरवळ यांचा माजी खासगी सचिव निलंबित

मुंबई : प्रतिनिधी

अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या कार्यालयाशी संबंधित लाचखोरी प्रकरणी त्यांचे तत्कालीन खासगी सचिव रामदास गाडे यांना राज्य शासनाने निलंबित केले आहे. मंत्रालयात फेब्रुवारी २०२४ मध्ये उघडकीस आलेल्या कथित लाचखोरी प्रकरणानंतर त्यांना खासगी सचिवपदावरून हटवून मूळ विभागात पाठविण्यात आले होते. आता शिस्तभंग आणि गैरवर्तणुकीच्या आरोपांवरून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाने यासंदर्भातील आदेश जारी केला. मुख्यमंत्री कार्यालयाकडून याबाबत सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. निलंबनाचा आदेश जारी झाला, त्या वेळी गाडे हे पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यरत होते. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्यपालांनी त्यांना तत्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची सुरुवात एका औषध दुकानाच्या मालकाने केलेल्या तक्रारीतून झाली होती. निर्मल शर्मा यांच्या औषध दुकानातील औषधांसाठी असलेल्या रेफ्रिजरेटरमध्ये पाण्याच्या बाटल्या आणि ओआरएस पाकिटे ठेवल्याचे आढळल्याने दुकानाचा परवाना महिनाभरासाठी निलंबित करण्यात आला होता. या निर्णयाविरोधात त्यांनी ७ फेब्रुवारी २०२४ रोजी मंत्रालयात अपील दाखल केले. त्यानंतर १३ फेब्रुवारी रोजी सुनावणीसाठी ते मंत्रालयात गेले होते.शर्मा यांच्या आरोपानुसार, सुनावणीदरम्यान त्यांना रामदास गाडे यांच्या केबिनमध्ये बसविण्यात आले. तेथे राजेंद्र धेरांगे नामक कर्मचाऱ्याने एक लाख १० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. यातील एक लाख रुपये वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी, तर १० हजार रुपये स्वतःसाठी असल्याचे त्याने सांगितल्याचा शर्मा यांचा दावा आहे. नंतर ही रक्कम निम्मी करण्याची तयारीही दर्शविण्यात आली होती. शर्मा यांनी दोन हजार रुपये ऑनलाइन, तर ५३ हजार रुपये रोख दिल्याचा आरोप केला होता.या कथित लाचखोरी प्रकरणाचे स्टिंग ऑपरेशन समोर आल्यानंतर गाडे यांना प्रतिनियुक्तीवरून कार्यमुक्त करून त्यांच्या मूळ विभागात पाठविण्यात आले होते. त्यानंतर ते मावळ येथे सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यरत होते. निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

समृद्धी महामार्गावर शासकीय वाहनावर दगडफेक; पाच प्रवासी थोडक्यात बचावले

छत्रपती संभाजीनगर :



नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. छत्रपती संभाजीनगरजवळील सावंगी परिसरात अज्ञात व्यक्तींनी शासकीय वाहनावर दगडफेक केल्याची घटना २० नोव्हेंबर रोजी घडली. या घटनेत वाहनातील पाच प्रवासी थोडक्यात बचावले. वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयाचे कार्यालय अधीक्षक हिंमत राठोड हे चार सहकाऱ्यांसह शासकीय कामानिमित्त पुण्याकडे जात होते. महामार्गावरील चॅनेल क्रमांक ४२६ जवळ वाहन पोहोचताच अचानक दगडफेक करण्यात आली. दगड वाहनाच्या पुढील काचेवर आदळल्याने काच फुटली. चालकाने प्रसंगावधान राखल्यामुळे मोठा अपघात टळला. घटनेनंतर मदतीसाठी ११२ क्रमांकावर तीन वेळा फोन केल्याचा दावा राठोड यांनी केला आहे. मात्र, तातडीने मदत मिळाली नसल्याची त्यांची तक्रार आहे. महामार्ग पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले; तरी आपत्कालीन मदत व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

समृद्धी महामार्गावर यापूर्वीही वाहनांचे टायर पंक्चर करून प्रवाशांना लुटण्याचे प्रकार घडल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे महामार्गावर नियमित गस्त, संवेदनशील ठिकाणी सुरक्षा व्यवस्था आणि तातडीने मदत मिळावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. द छत्रपती संभाजीनगर

शहरात थंडीचा कडाका वाढला; किमान तापमान १२.४ अंशांवर

छत्रपती संभाजीनगर



: नोव्हेंबर महिन्याच्या उत्तरार्धात शहरातील हवामानात मोठा बदल जाणवू लागला आहे. पहाटेच्या वेळी थंडीचा जोर वाढला असून नागरिकांना उबदार कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे. २१ नोव्हेंबर रोजी शहराचे किमान तापमान १२.४ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आल्याची माहिती स्थानिक वृत्तस्रोताने दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून सकाळच्या वातावरणात गारवा वाढत असल्याचे नागरिकांच्या अनुभवास येत आहे. विशेषतः

पहाटे कामासाठी बाहेर पडणारे नागरिक, दूध विक्रेते, वृत्तपत्र विक्रेते, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना थंडीचा अधिक त्रास जाणवत आहे. हवामान अभ्यासकांच्या माहितीनुसार उत्तर भारतातील हिमवृष्टी आणि थंड वाऱ्यांच्या प्रवाहाचा परिणाम मराठवाड्यातील तापमानावर होत आहे. विशेष म्हणजे सकाळी आणि रात्री थंडी जाणवत असली तरी दुपारच्या वेळी उन्हाचा चटका कायम आहे. शुक्रवारी कमाल तापमान ३१.३ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. सकाळी आणि दुपारी तापमानात मोठा फरक जाणवत असल्याने नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनी थंडीपासून बचावासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

कुर्ल्यात तरुण जोडप्याला हॉकी स्टिक, बेल्टने मारहाण; 8 अल्पवयीन मुलांवर गुन्हा दाखल



कुर्ला येथील एका बागेत किशोरवयीन जोडप्याला मारहाण केल्याप्रकरणी घाटकोपर पोलिसांनी आठ मुलांना ताब्यात घेतले आहे. शुक्रवारी (२० नोव्हेंबर) संध्याकाळी कुर्ल्यातील फिनिक्स मार्केटसिटी मॉलच्या मागे असलेल्या प्रमोद महाजन या गार्डनमध्ये हा प्रकार घडला. हे किशोरवयीन जोडपे गार्डनमध्ये गेले असता काही अल्पवयीन मुलांच्या गटाने त्यांना घेरले आणि शिवीगाळ केली, असे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. जेव्हा त्या किशोरवयीन मुलांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्या मुलांनी त्यांना हॉकी स्टिकने मारहाण केली आणि बागेतून हाकलून दिले. मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होऊ लागल्यानंतर घाटकोपर पोलिसांनी ता जोडप्याशी संपर्क साधून एफआयआर नोंदवला.

शुक्रवारी (२० नोव्हेंबर) मुंबईतील कुर्ला पश्चिम येथे तरुण आणि तरुणीवर सामूहिक हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. फिनिक्स मॉलच्या परिसरातील उद्यानात हे जोडपे बसले असताना ८ ते १० जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर हल्ला केल्याचा प्रकार घडला. समोर आलेल्या व्हिडीओनुसार, टोळक्याने तरुणाला घेरून बेल्ट, काठ्या आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तरुणाने हल्लेखोरांना विरोध करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्याकडून मारहाण सुरूच राहिली. यावेळी तरुणीलाही मारहाण करण्यात आली. तिच्यावर काठी आणि बुक्क्यांनी हल्ला करण्यात आला, तसेच जोडप्याच्या दिशेने दगड फेकल्याचेही व्हिडीओमध्ये दिसत आहे. या प्रकरणात हल्ला करणारे आठ जण विधीसंघर्षित बालक असल्याची माहिती समोर आली आहे. अल्पवयीन मुलांकडून सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारची हिंसक कृती घडल्याने नागरिकांमध्ये चिंता आणि संताप व्यक्त केला जात आहे. या जोडप्यावर हल्ला करण्यामागील कारण अद्याप समजू शकलेले नाही.

पोलिसांनी सांगितले की, कायद्याशी संघर्ष करणाऱ्या आठ अल्पवयीन मुलांविरुद्ध भारतीय मुंबई महापालिकेच्या प्रमोद महाजन न्याय संहितेच्या कलम १८९(२) (बेकायदेशीर जमावाचा सदस्य असणे), १८९(४) (घातक शस्त्र रात्री पार्टीसाठी बोलावलं अन्... काशीगावमधील धक्कादायक

रात्री पार्टीसाठी बोलावलं अन्... काशीगावमधील धक्कादायक प्रकरण, चार आरोपींचा शोध सुरू



मीरा रोड येथील काशीगावमधून सामूहिक बलात्काराची एक धक्कादायक घटना समोर आली आहे. १६ नोव्हेंबर रोजी एका मैत्रिणीने पार्टीसाठी बोलावल्यानंतर, १७ वर्षीय तरुणीवर दोन पुरुषांनी लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. ही घटना विनय नगरमधील एका फ्लॅटमध्ये घडली. पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, रात्री ९ च्या सुमारास पीडितेच्या २५ वर्षीय शीतल नावाच्या मैत्रिणीने तिला काही लोकांशी भेटण्यासाठी बोलावले होते.

तिथे तिची ओळख पियुष ठाकूर, दुष्यंत सिंग आणि आहत खान या तीन पुरुषांशी करून देण्यात आली होती.या आरोपींनी तिला आहत खानच्या फ्लॅटवर नेले आणि तिथे तिला बळजबरीने मद्यपान करायला लावले. तक्रारीत पुढे नमूद केले आहे की, त्यानंतर शीतल आणि पियूष खाली निघून गेले आणि त्या अल्पवयीन मुलीला इतर दोन पुरुषांसोबत तिथेच सोडून दिले. अहत खान आणि दुष्यंत सिंग अशी ओळख पटलेले ते दोन पुरुष, मध्यरात्री ते पहाटे ६ वाजेपर्यंतच्या काळात त्या मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार करत होते. या घटनेदरम्यान आपली सुमारे पाच ग्रॅम वजनाची सोन्याची साखळीही चोरली गेल्याचा दावा पीडितेने केला आहे. मुलगी घरी परतली नाही तेव्हा हा प्रकार उघडकीस आला; त्यानंतर तिच्या आईने ती कुठे आहे,

याचा शोध घेण्यास सुरुवात केली.काशीगाव पोलिसांनी सर्व चार आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) आणि बाल लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण (POCSO) कायद्याच्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे चारही आरोपी सध्या फरार असून पोलीस पथके त्यांचा शोध घेत आहेत

. या घटनेमुळे अल्पवयीन मुलांच्या सुरक्षिततेबाबत आणि ज्या परिस्थितीत त्यांना संभाव्य धोकादायक परिस्थितींचा सामना करावा लागतो, त्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रकरणाचा तपास सुरू असून अधिक तपशीलांची प्रतीक्षा आहे.

10 जानेवारीपासून जनगणना 2027 ची स्वयं-गणना; महाराष्ट्रात 25 जानेवारीपासून घरोघरी सर्वेक्षण



जनगणना 2027 च्या दुसऱ्या टप्प्यातील लोकसंख्या गणनेचे काम अचूक, पारदर्शक आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने या कामास सर्वोच्च प्राधान्य द्यावे. जनगणनेच्या माध्यमातून संकलित होणारी माहिती पुढील नियोजन आणि विविध विकासकामांसाठी महत्त्वपूर्ण असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले. जनगणना 2027 च्या दुसऱ्या टप्प्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रधान जनगणना अधिकाऱ्यांची राज्यस्तरीय परिषद 21 नोव्हेंबर रोजी सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे उद्घाटन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या आभासी उपस्थितीत झाले. जनगणना 2027 चे राज्यातील वेळापत्रकमहाराष्ट्रात 10 ते 24 जानेवारी 2027 या कालावधीत नागरिकांना ऑनलाइन स्वयं-गणना पोर्टलद्वारे स्वतःची माहिती नोंदवता येणार आहे. त्यानंतर 25 जानेवारी ते 28 फेब्रुवारी 2027 या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन लोकसंख्या गणना करतील. 28 फेब्रुवारीच्या मध्यरात्री बेघर लोकसंख्येची गणना करण्यात येईल, तर 1 ते 5 मार्च 2027 या कालावधीत पुनरावलोकन फेरी होणार आहे. या टप्प्यात नागरिकांची लोकसंख्या, सामाजिक आणि आर्थिक माहिती संकलित करण्यासाठी 40 प्रश्नांची डिजिटल प्रश्नावली वापरण्यात येणार आहे. यामध्ये नाव, कुटुंबप्रमुखाशी असलेले नाते, लिंग, वय, वैवाहिक स्थिती, धर्म, जात, दिव्यांगत्व, मातृभाषा, शिक्षण, व्यवसाय, रोजगार आणि स्थलांतर यासंबंधी माहितीचा समावेश आहे.परिषदेत जनगणना अधिनियम व नियम, पीई मोबाइल ॲप, एचएलबीसी आणि सीएमएमएस पोर्टल, गणना क्षेत्रांची निश्चिती, जनजागृती आणि देखरेख यासंबंधी तांत्रिक सत्रे घेण्यात आली. मास्टर ट्रेनर्स, जिल्हा व चार्ज अधिकारी आणि तांत्रिक सहाय्यकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून क्षेत्रीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण सुरू आहे. यानंतर प्रगणक आणि पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. परिषदेस नवी दिल्ली येथील भारताचे महानिबंधक कार्यालयाचे उपमहानिबंधक (सी अँड टी) जसपाल सिंग, सर्व विभागीय आयुक्त, राज्यातील प्रधान जनगणना अधिकारी, जनगणना कार्य संचालनालय, मुंबई तसेच महाराष्ट्र शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर विभागात साखर उतारा घटला; दुष्काळाचा ऊस उत्पादनाला फटका

छत्रपती संभाजीनगर :

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने मराठवाड्यातील शेतीसमोर पाणीटंचाईचे संकट उभे राहिले आहे.

त्याचा परिणाम ऊस उत्पादनावर आणि साखर कारखान्यांच्या कामकाजावर होत असल्याचे चित्र समोर आले आहे. छत्रपती संभाजीनगर विभागाचा साखर उतारा राज्यातील सर्वांत कमी असल्याची माहिती समोर आली आहे.१८ नोव्हेंबरअखेरच्या आकडेवारीनुसार, छत्रपती संभाजीनगर विभागातील १८ साखर कारखान्यांनी २५.०९ लाख मेट्रिक टन उसाचे गाळप केले आहे.

त्यातून १९.८९ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन झाले असून साखर उतारा ७.९३ टक्के नोंदविण्यात आला आहे. राज्याचा सरासरी साखर उतारा ८.७३ टक्के आहे. अपुऱ्या पावसामुळे उसाच्या वाढीवर आणि गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

पाण्याची उपलब्धता कमी झाल्यास शेतकऱ्यांना पिकांचे नियोजन करणे कठीण जाते. याचा परिणाम साखर कारखान्यांच्या उत्पादनावर आणि आर्थिक व्यवहारांवरही होऊ शकतो.

त्यामुळे आगामी काळात पाणी व्यवस्थापन आणि शेती नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे.

अन्नसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन; तीन हॉटेलसह मिठाई उत्पादकाचा परवाना निलंबित

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी



नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित अन्नसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर अन्न व औषध प्रशासनाने कठोर कारवाई केली आहे. 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील तीन हॉटेल आणि एका मिठाई उत्पादकाचा परवाना व नोंदणी प्रमाणपत्र निलंबित करण्यात आले आहे. १८ नोव्हेंबर रोजी करण्यात आलेल्या तपासणीत कन्नड तालुक्यातील वासडी येथील दोन आस्थापनांमध्ये अस्वच्छता, फरशीवर धूळ आणि घाण तसेच मिठाई उघड्यावर ठेवण्यात आल्याचे आढळले. कर्मचाऱ्यांकडे आवश्यक वैद्यकीय तपासणी अहवाल आणि FoSTaC प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्याचेही तपासणीत समोर आले. सिडको-वाळूज महानगर परिसरातील तिसगाव येथील हॉटेलमध्ये सांडपाणी निचऱ्याची व्यवस्था, स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याच्या तपासणी अहवालासंबंधी त्रुटी आढळल्या. देवळाई येथील मिठाई उत्पादकाकडे अन्नपदार्थांसोबत रसायने ठेवणे, अपुरे वायुवीजन आणि कीटक नियंत्रणाचा अभाव असल्याचे निदर्शनास आले. अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ मधील तरतुदींनुसार संबंधित आस्थापनांचा व्यवसाय पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्रुटी दूर करून फेरतपासणीत समाधानकारक सुधारणा आढळल्यानंतरच परवान्याबाबत पुढील निर्णय होणार आहे. नागरिकांनी मिठाई आणि खाद्यपदार्थ खरेदी करताना स्वच्छतेकडे लक्ष द्यावे, आले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

पाणीपुरवठ्याची माहिती आता १२ तास आधी; जल बेल ॲपमध्ये नवीन सुविधा

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी



शहरातील पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांना वारंवार महापालिका कार्यालयात चौकशी करण्याची गरज भासू नये, यासाठी प्रशासनाने 'जल बेल' ॲपमध्ये नवीन सुविधा सुरू केल्या आहेत. आता संबंधित भागातील पाणीपुरवठ्याची संभाव्य तारीख किमान १२ तास आधी समजू शकणार आहे. शहरातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक, पाणी येण्याची तारीख आणि जलवाहिनी गळती याबाबत नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. या समस्येवर उपाय म्हणून ॲपमधील माहिती व्यवस्था अधिक सक्षम करण्यात आली आहे. नव्या सुविधेनुसार ॲपमध्ये रंगांच्या माध्यमातून पाणीपुरवठ्याची स्थिती दर्शविण्यात येणार आहे. हिरवा रंग म्हणजे पाणीपुरवठा झालेला आहे, पिवळा रंग म्हणजे आगामी पुरवठ्याची संभाव्य तारीख आणि लाल रंग म्हणजे पाणीपुरवठ्यातील अडचण. जलवाहिनी फुटल्यास किंवा गळती आढळल्यास नागरिकांना ॲपवरून तक्रार नोंदवता येणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या दुरुस्तीची माहिती आणि काम पूर्ण झाल्यानंतरचे छायाचित्रही पाहता येणार आहे. महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या निर्देशानंतर या सुविधांमध्ये सुधारणा करण्यात आल्याची माहिती आहे. ॲप ८५ हजारांहून अधिक नागरिकांनी डाउनलोड केले असून दररोज १५ हजारांहून अधिक नागरिक त्याचा वापर करतात. नव्या सुविधेमुळे पाणीपुरवठ्यात अधिक पारदर्शकता येण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

जेल रोडसह मुक्तिधाम आणि देवळाली कॅम्प परिसरात 'या' दिवशी वीजपुरवठा बंद

नाशिक : प्रतिनिधी



नाशिक शहरातील काही भागांतील वीजपुरवठा रविवारी (दि. २२ नोव्हेंबर) सहा तास बंद राहणार आहे. महावितरणकडून पंचक, मुक्तिधाम आणि देवळाली कॅम्प उच्चदाब वाहिन्यांसह ३३ केव्ही सिक्युरिटी प्रेस विद्युत वाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत संबंधित विद्युत उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या परिसरातील वीजपुरवठा खंडित राहणार आहे.

कोणत्या भागात वीजपुरवठा राहणार बंद ?महावितरणच्या या कामामुळे जेल रोड, कैलासजी सोसायटी, भीमनगर, ब्रह्मगिरी सोसायटी, साने गुरुजीनगर, कलानगर, आशानगर, गंधर्व नगरी, लोकमान्यनगर आणि मोटवानी रोड परिसरातील वीजपुरवठा बंद राहणार आहे. याशिवाय पंचक, मुक्तिधाम आणि देवळाली कॅम्प विद्युत उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या इतर भागांनाही या वीजखंडित कालावधीचा फटका बसणार आहे.महावितरणचे ग्राहकांना आवाहनविद्युत वाहिन्यांची देखभाल आणि दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी हा नियोजित वीजखंडित कालावधी ठेवण्यात आला आहे. काम निर्धारित वेळेपूर्वी पूर्ण झाल्यास वीजपुरवठा लवकर सुरू केला जाऊ शकतो.

मात्र, काही तांत्रिक कारणांमुळे कामास विलंब झाल्यास वीजपुरवठा पूर्ववत होण्यास अधिक वेळ लागू शकतो. त्यामुळे संबंधित भागातील नागरिकांनी आणि वीज ग्राहकांनी याची नोंद घेऊन आवश्यक ती पूर्वतयारी करावी, असे आवाहन महावितरणच्या नाशिक शहर विभाग क्रमांक २ कडून करण्यात आले आहे.

मतदार यादी विशेष पुनरीक्षणाला गती; ३० नोव्हेंबरपर्यंत गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन

छत्रपती संभाजीनगर

जिल्ह्यात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाला गती देण्यात आली आहे. अनुपस्थित, स्थलांतरित, मृत तसेच दुबार मतदारांची माहिती अद्ययावत करण्यासाठी प्रशासनाने सुधारित वेळापत्रक निश्चित केले आहे. या प्रक्रियेत नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले आहे. निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार १८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत गणना प्रपत्र तयार करणे, त्यांचे मुद्रण, मतदारांपर्यंत वितरण आणि भरलेली प्रपत्रे संकलित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर १० डिसेंबरपर्यंत गणना प्रपत्रांची निकाली काढण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मतदार यादीमध्ये नाव, पत्ता आणि इतर आवश्यक तपशील योग्य असणे लोकशाही प्रक्रियेसाठी महत्त्वाचे



आहे. निवडणुकीच्या वेळी मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यात अडचण येऊ नये, यासाठी ही पडताळणी प्रक्रिया महत्त्वाची ठरते. मतदारांनी आपल्या भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक माहिती द्यावी. गणना प्रपत्र भरताना योग्य आणि अचूक माहिती देणे आवश्यक आहे. प्रशासनाच्या या मोहिमेमुळे मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत होण्यास मदत होणार आहे.

लग्नाचे आमिष दाखवून महिलेची फसवणूक; आरोपीला दुबईतून अटक


छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

लग्नाचे आमिष दाखवून महिलेचे लैंगिक शोषण तसेच अन्य दोन महिलांची आर्थिक फसवणूक करून परदेशात पळून गेलेल्या आरोपीला शहर पोलिसांनी दुबईतून अटक केली आहे. मोहम्मद माझीन असे आरोपीचे नाव असून या कारवाईमुळे गुन्हेगारी करून परदेशात पळणाऱ्यांना पोलिसांचा इशारा मिळाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे वर्षभरापूर्वी सिटी चौक पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. लग्नाचे आश्वासन देऊन एका महिलेचे वारंवार शोषण केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. याशिवाय अन्य दोन महिलांचीही आर्थिक फसवणूक केल्याची तक्रार करण्यात आली होती. तिन्ही महिलांकडून मिळून तब्बल १९ लाख ७३ हजार रुपये घेतल्याचा आरोप आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी परदेशात पळून गेला होता. मात्र शहर पोलिसांनी त्याचा शोध सुरू ठेवला. अखेर दुबईतून त्याला ताब्यात घेऊन भारतात आणण्यात आले. या प्रकरणामुळे महिलांची ओळख वाढवताना आणि आर्थिक व्यवहार करताना नागरिकांनी सावध राहण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

आजचे मराठी शब्दकोडे

काळ्या-पांढऱ्या चौकटींचा नमुना

पांढऱ्या चौकटीत अक्षरे भरा □ काळ्या चौकटी रिकाम्या ठेवा



■ काळी चौकट — अक्षर लिहू नका

□ पांढरी चौकट — अक्षर भरा

आडवे प्रश्न

१. भारताची राजधानी
२. महाराष्ट्राची राजधानी
३. जंगलाचा राजा
४. राष्ट्रीय पक्षी
५. पाण्याचा समानार्थी शब्द
६. फुलांचा राजा

उभे प्रश्न

१. रात्री आकाशात दिसतो
२. दूध देणारा प्राणी
३. आठवड्यातील एक वार
४. सूर्याचा समानार्थी शब्द
५. फळांचा राजा
६. पुस्तक वाचण्याची जागा

टीप: हा फक्त काळ्या-पांढऱ्या चौकटींचा नमुना आहे; प्रश्नांशी जुळणारी अंतिम क्रमांकित शब्दरचना नाही.

पत्नीच्या खुनाचा खोटा कॉल करणं पडलं महागात ! पतीविरोधात गुन्हा दाखल



दिंडोरी: प्रतिनिधी

नाशिकच्या दिंडोरीमध्ये एका व्यक्तीने चक्क आपल्या पत्नीचा खून झाल्याची खोटी माहिती पोलिसांना दिली. विशेष म्हणजे, डायल ११२ या आपत्कालीन क्रमांकावर फोन करून त्याने पोलिसांची चांगलीच धावपळ उडवली. मात्र, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास केला असता, संपूर्ण प्रकार खोटा असल्याचं समोर आलं. याप्रकरणी आता संबंधित पतीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शनिवारी सकाळी सव्वासातच्या सुमारास दिंडोरी तालुक्यातील बोराचा पाडा येथे एका महिलेचा खून झाल्याचा कॉल डायल ११२ वर आला. कॉलरने आपली पत्नी गंगुबाई डाबल हिचा विळवंडी शिवारात खून झाल्याची माहिती दिली. घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सरपंचांनाही घटनास्थळी बोलावण्यात आलं.मात्र, पोलिसांनी चौकशी केली असता धक्कादायक सत्य समोर आलं. पुंडलिक डाबल असं कॉल करणाऱ्या व्यक्तीचं नाव असून, किरकोळ घरगुती वादातून त्याची पत्नी मुलांसह मामाच्या गावी गेली होती. पत्नीचा खून झाल्याचा दावा पूर्णपणे खोटा असल्याचं स्पष्ट झालं. पोलिसांनी खातरजमा केली असता पत्नी आणि मुलं सुखरूप असल्याचंही निष्पन्न झालं.केवळ पोलिसांना त्रास देण्याच्या उद्देशाने डायल ११२ वर खोटी माहिती दिल्याप्रकरणी पुंडलिक डाबल याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम २१७ अंतर्गत दखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, डायल ११२ ही सेवा नागरिकांच्या आपत्कालीन मदतीसाठी आहे. त्यामुळे या सेवेचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा नाशिक ग्रामीण पोलिसांनी दिला आहे.

शहरात थंडीचा कडाका वाढला; तापमान १२.४ अंशांवर

छत्रपती संभाजीनगर : प्रतिपिधी

नोव्हेंबर महिन्याच्या उत्तरार्धात शहरातील वातावरणात मोठा बदल जाणवू लागला आहे. पहाटेच्या वेळी थंडीचा कडाका वाढत असून नागरिकांना उबदार कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे. शहराचे किमान तापमान १२.४ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आल्याची नोंद झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून सकाळी आणि रात्रीच्या वेळी गारवा वाढत आहे. दिवसा उन्हाचा चटका जाणवत असला तरी पहाटे वातावरणात थंडी अधिक जाणवत आहे. हवामानातील या बदलामुळे नागरिकांच्या दैनंदिन दिनचर्येवरही परिणाम होत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेर कामासाठी जाणाऱ्या नागरिकांनी थंडीपासून बचाव करण्यासाठी योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. सकाळी लवकर बाहेर पडताना उबदार कपडे वापरणे आणि आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. नोव्हेंबरच्या अखेरीस थंडीचा जोर आणखी वाढण्याची शक्यता असल्याने सतर्क राहावे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

काशक, मालक **श्री. रोहित विकास पाटील** यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर-1 येथून प्रकाशित केले. **संपादक : रोहित विकास पाटील** **email :** hinduprakashvarta@gmail.com **website :** www.hinduprakashwarta.com **PRGI No.**: MHMAR/25/A2358 **संपर्क क्र. : 7261999911**